(17)



Exh-24
B

रे.सि.अ.नं.३८/२०२४

इस्लामपूर येथील मे.जिल्हा न्यायाधिशसाो,यांचे कोर्टात

**सौ.मनोरमा प्रताप बर्गे ---- वादी**

**विरूध्द**

**श्री.तात्यासो भाऊसो सुर्यवंशी ---- प्रतिवादी**

यातील रिस्पॉडंट नं.१सी१ ते १सी ४ तर्फे अपेलंट यांचे अपील मेमोस म्हणणे खालीलप्रमाणे.

१ अपेलंट यांचे अपील मेमो मधील केलेले कथन प्रस्तूत रिस्पॉडंट यांना मान्य व कबूल नाही.

२ अपेलंट यांचे अपील आहे त्या स्वरूपात कायदयाने चालणेस पात्र नाही.

३ अपेलंट यांचे अपिल मेमोमधील कलम ३ मधील कथन मान्य व कबुल नाही. तसेच अपेलंट यांचे वडील अशिक्षित असलेचे कथन पुर्णत: खोटे व लबाडीचे आहे. याउलट अपेलंट यांचे वडील शिकलेले असुन याकामी त्यांचा शाळा सोडल्याचा दाखला मुळ दाव्याच्याकामी नि.२०२ कडे दाखल आहे तरीही अपेलंट यांनी अपिल मेमोमध्ये वडील अशिक्षित असलेचे खोटे कथन केलेचे दिसुन येते. तसेच दि.२५/०९/१९८७ रोजीचे खरेदीपत्र मयत तात्यासोा यांनी जबरदस्तीने करुन घेतलेचे कथन पश्चात बुध्दीचे आहे. तात्यासोा यांनी जबरदस्तीने खरेदीपत्र करुन घेतले असते तर अपेलंट यांचे वडील यांनी तात्यासोा यांचे विरुध्द कधीही त्यांच्या हयातीत फौजदारी दाखल केलेली नाही. त्यामुळे अपिलमेमोमध्ये त्याबाबत केलेले आरोप मान्य व कबुल नाही.

४ अपिलमेमो ५ मधील केलेले कथन पुर्णत: चुकीचे आहे. तसेच ताबा न मिळालेचे कथन पुर्णत: खोटे व लबाडीचे नमुद केले आहे. तसेच कलम ६ मधील कथन मान्य व कबुल नाहीत. वस्तुत: अपेलंट यांनी जो रे.दि.मु.नं. ९५/२००४ चा दाखल केला तो दावा मुलत: मयत तात्यासोा यांचे मुखत्यार म्हणुन श्री. शिवाजीराव बापुसोा खंडागळे यांचे विरुध्द दाखल केला. खालील मे ट्रायल कोर्टात नि.१८२ कडे रे.दि.मु.नं.९५/२००४ चा रोजनामा दाखलकेला आहे. त्यामध्ये मुखत्यारपत्र दाखल असलेचे नमुद नाही. तसेच मुखत्यारपत्राची नक्कल मिळावी म्हणुन नि.१८३ कडे नक्कलेचा अर्ज दाखल केला आहे. त्यामध्ये ही मुखत्यारपत्र मुळ रे.दि.मु.नं.९५/२००४ च्याकामी दाखलनसलेने ते देता आले नाही. असा उल्लेख करुन अर्जनिकाली काढलेला आहे. वस्तुत: शिवाजीराव बापुसोा खंडागळे यांना तात्यासोा यांनी कधीही मुखत्यारपत्र लिहुन दिलेलेनव्हते त्यामुळे त्याबाबतचे अपिल मेमोमधील कथन पुर्णत: खोटे व लबाडीचे आहे. सबब अपिल मेमोमधील कलम ६ मधील कथन मान्य व कबुल नाही. अपेलंट यांने अपिल मेमो कलम ७ ते १२ मध्ये केलेले कथन मान्य व कबुल नाही. मे ट्रायल कोर्टानी त्यांचेसमोर झालेले जाबजबाब उलट तपास रेकॉर्डवर असणारी कागदपत्रे पाहुन त्याआधारेच वादी/अपेलंट यांचा दावा मुदत बाहय असलेने रद्द केलेला आहे. त्यामुळे खालील मे कोर्टानी दिलेला निकाल योग्य व कायदेशीर असाच आहे. तसेच कलम १४, १५, १६ मधील कथन पुर्णत: चुकीचे असलेने प्रस्तुत रिस्पॉडंट यांना मान्य व कबुल नाही. त्यामुळे वरील कलमातील सर्व मजकुर खोटा व लबाडीचा आहे.

५ मे कोर्टाने काढलेले सर्व मुद्दे नि.३४ त्याअनुषंगाने मे कोर्टासमोर आलेले कागदोपत्री पुरावे तसेच नि. ३८ नि.११४ नि.१५० कडे वादी प्रतिवादी यांचे जाबजबाब तसेच मुळ निकालपत्र नि.२०३ मध्ये परिच्छेद नं. १२ मध्ये नमुद केलेले सविस्तर कागदपत्रांचे वर्णन याकामी मे कोर्टानी तपासुन पाहुन निकाल दिलेला आहे. त्यामुळे वादीचा मुळ दावा हा मुदतबाहय असलेनेच तो रद्द केलेला आहे. त्याबाबत मुद्दा क्र. ६ ड याचे अवलोकन केलेस मे.ट्रायल कोर्टानी त्याबाबतचा मुद्दा नकारार्थी नोंदविलेला आहे. त्यामुळे खालील कोर्टाच्या निष्कर्षा अनुषंगाने वादीचा दावा मुदतबाहय असलेने तो नामंजुर केलेला आहे.

६ अपेलंट यांनी शिराळा येथील सर्व्हे नं.७/६ मधील मिळकत ही वाटपाचा दावा रे.दि.मू.नं.५२/२००६ न्यायप्रविष्ठ असताना महेश तानाजी पाटील यांना मिळकत बेकायदेशीरपणे हस्तांतर केलेली आहे. त्यांनर महेश पाटील यांनी दत्त नागरी सह. पतसंस्था यांचेकडून र.रू.१२ लाख मात्रचे कर्ज काढले आहे. त्यांनंतर सदर बोजा मिळकतीवर निर्माण करणेकामी महेश पाटील प्रयत्न करत असलेने यातील रिस्पॉडंट यांनी रितसर म्हणणे देवून हरकत नोंदविली.परंतू मंडळ अधिकारी यांनी त्याकडे दुर्लक्ष करून त्यांनी वरील कर्जाचे तारणगहाण दस्ताची नोंद बेकायदेशीरपणे घेतलेली आहे.वादी/अपेलंट हे दावा न्यायप्रविष्ठ असताना बेकायदेशीपणे मिळकत हस्तांतर करून गुतांगुत करीत आहेत.सबब सदर मिळकतीबाबत झालेला विक्रीचा व तारणगहाण दस्ताचा बोजा ताबडतोब रदद होणे आवश्यक आहे.

७ यातील रिस्पॉडंट यांनी मूळ दावेचेकामी नि. ७३ व नि. १३७ कडे जी कैफियत दिली आहे.त्यातील कथनही या म्हणणेचा भाग समजणेत यांवा व तो वाचणेस परवानगी असावी.

८ याबाबत खरी वस्तुस्थिती अशी की,अपेलंटचे/वादीचे वडील भिमराव देशमूख यांचेकडून यातील रिस्पॉडंट नं.१कअ व १कब यांचे पुर्वाधिकारी म्हणजेच मयत तात्यासो भाऊसो सुर्यवंशी यांनी दावा कलम ७/१अ क्षेत्र २.२३ आर पोट खराब ०.०३ आकार रू.४.३२ यापैकी ५ आणे ४ पैचा हिस्सा व सर्व्हे नं. ७/६ ० हे. ४९ आर म्हणजेच ५ आणे ४ पैचा हिस्सा ही मिळकत दिनांक २५/९/१९८७ रोजी त्यावेळचे योग्य त्या बजारभावाने खरेदी घेतलेले होते.सदर खरेदीपत्राची नोंद दोन्ही मिळकतीचे रेकॉर्ड सदरी फेरफार नं८०११ नुसार अपेलंट/वादीचे पूर्वाधिकारी समक्ष झालेली होती व आहे. खरेदीपत्रात नमुद केलेल्या कारणास्तव भिमराव देशमुख यांनी सदरची मिळकत विक्री केलेली होती. विक्री पश्चात तात्यासो भाऊसो सुर्यवंशी यांचीच कब्जेवहीवाट ते मयत होईपर्यत होती. तात्यासो सुर्यवंशी हे मयत झालेनंतर त्यांचे वारस यांचे सदर मिळकतीत कब्जेवहीवाट होती व आहे. विक्री केलेल्या मिळकतीशी अपेलंट यांचा काहीही हक्क व हितसंबंध नव्हता व नाही. त्यामुळे अपेलंट १९८७ साली झालेल्या खरेदीपत्राबाबत २२ वर्षानंतर कोणतीही तक्रार अगर हरकत करता येणार नाही. अपेलंट यांची तक्रार ही मुदत बाहय असलेने अपेलंट / वादीचा दावा प्रस्तूत प्रतिवादी यांचे विरूध्द कायदयाने चालणेस पात्र नाही. वादीचा दावा मुदतीत नाही या एकाच मुदयावरून अपेलंट वादीचा अपिल प्रथम दर्शनी फेटाळणेस पात्र आहे. भिमराव देशमुख यांचेकडून मयत तात्यासो सुर्यवंशी यांनी करून घेतलेले खरेदीपत्र हे कायदेशीर असेच होते व आहे. त्यामुळे २२ वर्षानंतर अपेलंट/ वादी यांना खरेदीपत्र रद्द करून मागता येणार नाही-

९ वरीलप्रमाणे खरी वस्तूस्थिती असलेने अपेलंट /वादीचा अपील कायदयाने चालणेस पात्र नाही. अपेलंट /वादींना दिनांक २५/०९/१९८७ रोजीचे भिमराव देशमुख यांनी मयत प्रतिवादी नं.१ म्हणजे तात्यासो सुर्यवंशी यांना करुन दिलेले कायदेशीर खरेदीपत्र पोकळ , बिनभरणेचे , बेकायदेशीर व रद्दबातल असलेबाबत

कायदयाने मागणी करता येणार नाही. सदरची मागणी पूर्णतः मुदतबाहय असलेने वादीचा अपील प्रथमदर्शनी फेटाळणेस पात्र आहे.

१० दिनांक २५/९/८७ रोजी झालेल्या खरेदपत्राबाबत यातील वादी अगर त्यांचे पूर्वाधिकारी भिमराव देशमूख यांनी त्यांचे हयातीत कधीही त्यांची फसवणूक झाली म्हणून कोणत्याही पोलीस स्टेशनला कधीही तक्रार केलेली नव्हती व नाही.यावरून त्यांना झालेला व्यवहार हा मान्य व कबूल होता.तसेच यातील वादी हे नात्यातीलच असलेने व त्यांना खरेदीपत्रातील भरणा मान्य व कबूल नसता तर त्याबाबतही त्यांनी वेळीच तक्रार केली असता,परंतू त्यांनी वेळीच तक्रार केली नसलेने मोबदलाही त्यांना मान्य होता व आहे असाच त्याचा अर्थ होतो.सबब अपेलंट यांचे अपील सद्‌भावाचा नसलेने ते प्रथमदर्शनीच फेंटाळणेत यांवा.

११ प्रतिवादीचे/ रिस्पॉडंटचे पूर्वाधिकारी म्हणजे तात्यासो यांनी दावा मिळकतीतील ४० आर २००१ साली प्रतिवादी नं.२ व ३ यांना विक्री केली त्यास अपेलंटचे/वादीचे पती यांनी साक्षीदार म्हणून सही केली आहे.त्यामुळे खरेदीपत्राबाबत कोणतीही माहीती अपेलंट /वादीस नव्हती असे जे कथन अपीलमेमोमध्ये अपेलंट/वादीनी नमुद केले आहे,ते पूर्णतः चुकीचे आहे. सबब वरील व्यवहाराची माहीती अपेलंट/वादीस असूनही त्यांनी कोणतीही तक्रार वेळीच केली नसलेने अपील रदद होणेस पात्र आहे.

१२ अपेलंट/वादीचे मयत वडील यांना जगन्नाथ पाटील रा.शिराळा यांनी र.रू.४०००/— दिले नंतर सदरचा गहाणाचा व्यवहार नोदणीकरणेत आला. गहाणाची नोंद फेरफार नं.६७१६ अन्वये नोद करणेत आलेली होती व आहे. त्यानंतर पूढे १९८७ साली अपेलंट/वादीचे वडील यानी तीच मिळकत तात्यासो सूर्यवंशी

याना रितसर विक्री केलेली आहे. सदर व्यवहाराची नोंद फेरफार नं.८०११ नुसार मिळकतीचे रेकॉर्ड सदरी झालेली आहे.वरील व्यवहारबाबत विक्री विरोधात जगन्नाथ पाटील यांनी त्यांचे हयातीत कोणतीही तक्रार दिलेली नव्हती व नाही. पूढे अपेलंट/वादीचे वडील सन १९९८ साली मयत झालेनंतर अपेलंट/वादीनी वारस नोंद करताना फेरफार नं.९५३० मध्ये सर्व्हे नं.७/६ मिळकत नमूद केलेली नाही. अपेलंट/वादीची नोंद केवळ फेरफार नं.९५३० मध्ये नमूद असलेल्या मिळकतीस झालेली आहे. अपेलंट/वादीनी सर्व्हे नं.७/६ ही मिळकत फेरफार नं.९५३० चा तयार होत असताना सोडून दिली आहे व सन ९८ नंतर २००६ रोजी म्हणजे ६ वर्षानी १९८७ साली झाले व्यवहाराबाबत खोटी तक्रार व अपील केले आहे.सबब पूर्वीचे व्यवहारबाबत दावेत माहीती लपवून ठेवून कपटी मनाने व वारसांना त्रास देणेचे उददेशाने मूदत बाहय दावा केलेला असलेने अपेलंट/वादीनी वादीचा दावा रदद झालेला आहे तो बरोबर आहे.

१३ यातील अपेलंट/वादीनी वडील भिमराव देशमुख मयत झालेनंतर दिनांक १४/१२/२००४ रोजी गहाणमुक्तीचा दावा केलेचे दिसून येते.त्याचा निकाल दिनांक १४/७/२००९ रोजी झालेला दिसून येतो.त्यानंतर वादीनी दिनांक २८/१०/२००९ रोजी डिक्री फायनल अर्ज नं.३/२००९ चे काम दाखल केलेचे दिसून येते. त्या दरम्यानं प्रतिवादी यांचे पूर्वाधिकारी तात्यासो सूर्यवंशी हे दिनांक १५/६/२०११ रोजी मयत झाले.परंतू वादीनी तात्यासो सूर्यवंशी यांचे वारस रेकॉर्डवर न आणताच पुढे काम चालविले आहे.त्यामुळे मयता विरूध्दची कारवाई ही सुरवातीपासूनच बेकायदेशीर असून त्यातील आदेश आमचेवर बंधनकारक कधीही

नव्हते व नाहीत.सबब खरी वस्तुस्थिती लपवून ठेवून अपेलंट/वादीनी दावेवरील निकाला विरूध्द दाखल केला असलेने ते नामंजूर करणेस पात्र आहे.

१४ अपेलंट/वादीनी त्यांचे वडील यांनी फेरफार नं८०११ नुसार विक्री केलेल्या मिळकती स.न.७/१अ व ७/६ विरोधात इस्लामपूर येथील दिवाणी न्यायालयात रे.दि.मु. नं.२५/२००५ नुसार रितसर दावा केलेला होता .त्या दाव्यामध्ये प्रतिवादी नं १ मयत तात्यासो सुर्यवंशी व तात्यासो यांनी स.न. ७/१ मधील ४० आर विक्री केलेले श्री.श्रीकांत तानवडे व श्रीकांत पाटील यांना प्रतिवादी नं २ व ३ हजर झालेले आहेत.सदरचा वरील दावा प्रलंबित असताना तात्यासो सुर्यवंशी हे पुणे येथे जानेवारी २०११ पासून आजारी असताना दिनांक १५/६/११ रोजी मयत झाले.त्यानंतर मे.कोर्टानी सदर दाव्यामध्ये मयत तात्यासो यांचे वारसांना दावेकामी हजर होणेस नोटीस बजावली व अपेलंट/वादीचा दुसरा वाटपाचा दावा रे.दि.मू. नं.५२/२००६ हा मौजे शिराळा येथील मे.कोर्टात प्रलंबित असल्यामुळे सदरचा दावा मिळकती शिराळा येथील असल्यामूळे सन २०१२ मध्ये रे. दि.मू.नं.२५/२००५ यास शिराळा येथील मे.कोर्टात वर्ग करणेत आला त्यासच नविन रे.दि.मु.नं ११/२०१२ असा देणेत आला आहे.

१५ अपेलंट/वादीनी सदर दावा प्रलंबित असताना तसेच स.नं. ७/६ या मिळकती विरूध्द दावा प्रलंबित असताना जाणीवपूर्वक शिराळा येथील गहाणमुक्तीचा दावा रे.दि.मु. नं.९५/२००४ चा दाखल केला.त्यामध्ये तात्यासाो सुर्यवंशी यांचे मुखत्यार म्हणून शिवाजी खंडागळे असे नमुद केलेले आहे. ते पूर्ण चुकीचे आहे कारण जी मिळकत अपेलंट/वादीचे वडीलांनी तात्यासो सुर्यवंशी

यांना विक्री केलेली आहे त्याच मिळकती बाबत पुन्हा दावा केलेला आहे. अपेलंट/वादीचे वडील सन १९९८ साली मयत झालेले असून अपेलंट/वादीची नोंद फेरफार नं. ९५३० नूसार सदर मिळकत अपेलंट/वादीचे नावारून कमी केलेली आहे. तरीसुध्दा अपेलंट/वादीनी प्रवादी तात्यासाो सुर्यवंशी सध्या मयत यांचे मुखत्यार शिवाजी खंडागळे व अपेलंट/वादीचा वाटेकरी हणमंत हिरवडेकर यांची साक्ष सादर करून दिशाभूल केलेली आहे. कारण गहाणमुक्ती नंतरच अपेलंट/वादीचे वडीलांनी सदर मिळकती तात्यासो यांना विक्री केली आहे. अपेलंट/वादीचे वडीलांनी त्याबाबत त्यांचे हयातीत कोठेही तक्रार केलेली नाही. तसेच नोंदी विरूध्द अपील केलेले नाही. आज २२ वर्षानी अपेलंट/वादी यांनी रिस्पॉडंट/प्रतिवादी मयत तात्यासो सुर्यवंशी व जगन्नाथ पाटील मयत झालेनंतर नव्याने कागदपत्रे सादर केले आहेत.

१६ वास्तविक पाहता गहाणमुक्तीचा दावा दिनांक १४/१२/२००४ रोजी दाखल केला आहे. मे. कोर्टानी अशंत: निकाल दिनांक १४/९/२००९ रोजी दिलेला आहे. त्यामध्ये मुखत्यार शिवाजी खंडागळे यांचे मुखत्यारपत्र दाखल नाही.त्या दाव्याचा हुकूमनामा दिनांक २०/१/२०११ रोजी झाल्याचे वादीने कोर्ट कमिशन केलेले असून दिनांक ३/६/२०११ रोजी वादीने जगन्नाथ पाटील यांचेकडून गहाणखत परत खरेदी दस्त नं.९६२/२०११ केलेले आहे. दरम्यान तात्यासो आजारी असल्याचे अपेलंट/वादीस पूर्णपणे माहीत होते म्हणूनच अपेलंट/वादीनी घाईगडबडीने शिवाजी खंडागळे यांना मुखत्यार असलेचे नमुद करून निकाल करून घेतला. तसेच डिक्री फायनल करून मुळ दावा ११/२०१२ चा प्रलंबित असताना स.न. ७/६ ही मिळकत

श्री शिवाजी शिंदे यांना मयत तात्यासाो यांचे वारस हयात असताना विक्री केलेली आहे. अपेलंट/वादीनी खरी वस्तुस्थिती लपवून ठेवून फसवणूक केलेली आहे. व खोटा दावा दाखल केला होता व आहे. सबब वरील प्रमाणे खरी वस्तुस्थिती असून अपील रदद करणेत यांवे.

१७ **सबब मे.कोर्टास विनंती की,** मे.ट्रायल कोर्टानी जे मुददे काढून त्यावर दिलेले निष्कर्ष हे योग्य व कायदेशीर असलेने खालील मे.कोर्टानी दिनांक २२/२/२०२४ रोजी रे.दि.मू.नं.११/२०१२ चे कामी दिलेला **निकाल हा ~~[illegible]~~ कायम करणेत यांवा.** सबब अपेलंट यांचे अपिल हे कोणत्याही गूणावर चालणेस पात्र नसलेने ते खर्चासहीत रद्द करणेत यावे, अशी मे कोर्टास विनंती आहे.

येणेप्रमाणे अपीलमेमोस म्हणणे असे

इस्लामपूर

दिनांक.२९/०१/२०२५